आकाशवाणी नागपूर

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

शनिवार, दिनांक २० एप्रिल २०२४

ठळक बातम्या

- गेल्या दशकात झालेल्या समावेशक विकासानुसार 'सबका साथ सबका विकास' सार्थ ठरवण्यासाठी आपलं सरकार वचनबद्ध असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच नांदेड आणि परभणी येथील सभेत प्रतिपादन.
- पहिल्या टप्प्यात काल पूर्व विदर्भातील पाच मतदारसंघांसाठी अंदाजे सरासरी ६१ पूर्णांक ८७ शतांश टक्के मतदान.
- उदया राष्ट्रीय जनसंपर्क दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन.
- अकोला सलग दुसऱ्या दिवशी विदर्भात सर्वात उष्ण, पारा ४४ अंशावर.

*****

पंतप्रधान- नांदेड/परभणी सभा

भारतातल्या मजबूत लोकशाहीकडे संपूर्ण जगाचे लक्ष असून लोकशाहीत मतदान ही सर्वात मोठी ताकद आहे. त्यामुळे देशात होत असलेल्या लोकसभेच्या निवडणुकीत सर्वांनी मतदान करण्याचं आवाहन भाजपचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते आज नांदेड इथं निवडणूक प्रचारसभेत बोलत होते. पहिल्या टप्प्यातल्या मतदानाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं. काँग्रेसने आपल्या कार्यकाळात दलित, गरीब यांच्याकडे दुर्लक्षच केल्याचा आरोप त्यांनी केला. येत्या पाच वर्षांत देशात विकास घडवून आणण्यासाठी आपण वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चारही त्यांनी केला. यानंतर त्यांनी परभणी इथंही प्रचारसभा घेतली. गेल्या दशकात झालेल्या समावेशक विकासानुसार 'सबका साथ सबका विकास' सार्थ ठरवण्यासाठी आपलं सरकार वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशासाठी आपलं जीवन दिलं आहे. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिलांना आता लोकसभा व विधानसभेत सुद्धा आरक्षण मिळणार आहे. तसेच ग्रामीण भागातील महिलांनी तयार केलेले उत्पादन देशभरात दिसावे यासाठी प्रत्येक एअरपोर्ट, बस व रेल्वे स्थानकावर जागा आरक्षित ठेवण्यात

येणार असल्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. भारतीय जनता पक्षाच्या लोकसभेच्या उमेदवार विद्यमान खासदार नवनीत राणा यांच्या प्रचारासाठी आज दर्यापूर येथे प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

<u>मतदान टक्केवारी</u>

पहिल्या टप्प्यात काल महाराष्ट्रातल्या भंडारा गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली-चिमूर, नागपूर आणि रामटेक या पाच मतदारसंघांसाठी अंदाजे सरासरी ६१ पूर्णांक ८७ शतांश टक्के मतदान झालं. गडचिरोली-चिमूर मतदार संघात सर्वाधिक ७० पूर्णांक ३८ टक्के मतदानाची नोंद झाली, तर नागपूर मतदारसंघात ५४ पूर्णांक ४६ टक्के मतदान झालं. या सर्वच मतदारसंघांमध्ये २०१९ च्या तुलनेत मतदानात घसरण झाल्याचं दिसलं. २०१९ मध्ये गडचिरोली-चिमूर मतदार संघात ७२ पूर्णांक ३३ टक्के, तर नागपूर मतदारसंघात ५४ पूर्णांक ४६ टक्के मतदान झालं होतं. भंडारा - गोंदिया मतदारसंघात यंदा ६४ पूर्णांक ७२ टक्के, चंद्रपूरमध्ये ६३ पूर्णांक ७ शतांश टक्के, तर रामटेक मतदारसंघात ५९ पूर्णांक ५८ टक्के मतदानाची नोंद झाली. या टप्प्यात नितीन गडकरी, सुधीर मुनगंटीवार, प्रतिभा धानोरकर, राजू पारवे, श्यामकुमार बर्वे, सुनील मेंढे, प्रशांत पडोळे, अशोक नेते, नामदेव किरसान या प्रमुख नेत्यांसह एकूण ९७ उमेदवारांचं भवितव्य मतदान यंत्रात बंद झालं आहे.

<u>तिसरा टप्पा</u>

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी दाखल उमेदवारी अर्जांची आज छाननी होत आहे. यामध्ये राज्यातल्या उस्मानाबाद आणि लातूरसह ११ मतदारसंघांचा समावेश आहे. २२ एप्रिल अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस असून, या टप्प्यात सात मे रोजी मतदान होणार आहे.

<u>लोकनिर्णय महाराष्ट्राचा’</u>

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत.

## डॉ.डी.वाय चंद्रचूड

नवीन गुन्हेगारी कायदे लागू करणे हे स्पष्टपणे दर्शवते की देश बदलत आहे आणि पुढे जात आहे असं भारताचे सरन्यायाधीश डॉ.डी.वाय चंद्रचूड यांनी म्हटले आहे. आज नवी दिल्लीतील एका परिषदेला ते संबोधित करत होते ते म्हणाले की भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष अधिनियम या तीन फौजदारी कायदे लागू केल्यामुळे, देश आपल्या फौजदारी न्याय व्यवस्थेच्या महत्त्वपूर्ण फेरबदलासाठी सज्ज झाला आहे.

## जनसंपर्क दिन

उदया **21** एप्रिल रविवार रोजी राष्ट्रीय जनसंपर्क दिनानिमित्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठाच्या जनसंपर्क विभागाचे प्रमुख डॉ. मोईज मन्नान हक व पत्र सुचना कार्यालयाचे उपसंचालक शशिन राय यांचा उत्कृष्ट जनसंपर्क अधिकारी म्हणून गौरव करण्यात येणार आहे. पब्लिक रिलेशन सोसायटी ऑफ इंडिया नागपूर चाप्टर तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालय नागपूर-अमरावती विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय जनसंपर्क दिन साजरा करण्यात येणार आहे. रवीभवन येथील सभागृहात सायंकाळी **6** वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमास कराड विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.वेदप्रकाश मिश्रा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून माहिती व जनसंपर्क विभागाचे संचालक डॉ. राहुल तिडके यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. राष्ट्रीय जनसंपर्क दिनानिमित्त सनातन व्हॅल्यु अँड इमर्जीन इंडिया, रोल ऑफ पब्लिक रिलेशन या विषयावर डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडिया, वर्धा चप्टर व यशवंतराव दाते स्मृती संस्था, वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने 'सनातन मूल्य आणि उदयोन्मुख भारत: जनसंपर्काची भूमिका' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन साबळे प्लाट, पावडे चौक येथील प्रदीप दाते यांच्या निवासस्थानी करण्यात आले आहे. याप्रसंगी महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयातील दूर शिक्षण निदेशालयाचे निदेशक प्रो. आनंद पाटील मुख्य वक्ता म्हणून तर यशवंतराव दाते स्मृति संस्था पुरस्कार समितीचे संयोजक डॉ. राजेंद्र मुंढे विशेष अतिथी म्हणून संबोधित करतील.

जाहीर सभा

सर्वसामान्यांच्या हितासाठी महाविकास आघाडीला मत द्यावं, असं आवाहन राष्ट्रवादी कॉँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज केलं. पवार यांनी आज महाविकास आघाडीचे छत्रपती संभाजी नगरचे उमेदवार चंद्रकांत खैरे आणि जालना मतदारसंघातील उमेदवार डॉक्टर कल्याण काळे यांच्यासाठी प्रचारसभा घेतली त्यावेळी ते बोलत होते. सद्यस्थितीत सर्वत्रच बेरोजगारी वाढली आहे, शेतकरी दुष्काळाचा सामना करत आहेत, पेट्रोल, गॅसच्या किंमती वाढल्या आहेत याचा विचार करून मत द्यावं असं ते म्हणाले.

सभा

बहुजन वंचित आघाडीचे बुलढाणा लोकसभा मतदारसंघातील उमेदवार वसंत मगर यांच्या प्रचारासाठी शुक्रवारी बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथे बहुजन वंचित आघाडीचे संस्थापक प्रकाश आंबेडकर यांची सभा झाली. वंचितच्या उमेदवाराला विजयी करण्याचं आवाहन करताना त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या धोरणावर टीका केली.

मतदार जनजागृती

वाशिम यवतमाळ लोकसभा मतदारसंघांमध्ये दिनांक **26** एप्रिल रोजी मतदान असून या मध्ये मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी समाजातील सर्वच घटकांनी प्रयत्न करावे, असे आवाहन वाशिमच्या जिल्हाधिकारी भुवनेश्वरी एस. यांनी आज पत्रकार परिषदेत केले. लोकसभेच्या मतदानामध्ये टक्केवारी वाढण्यासाठी जिल्हा प्रशासन वेगवेगळ्या माध्यमातून मतदार जनजागृती करीत आहे. जिल्हा प्रशासनाच्या या जनजागृती कार्यक्रमांला सर्वच माध्यमानी चांगली प्रसिद्धी द्यावी आणि नागरिकांना मतदानासाठी प्रोत्साहित करावे असे आवाहन आहे त्यांनी यावेळी केले.

ज्योती मेटे

आपण लोकसभा निवडणूक लढवणार नसल्याचं शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ ज्योती मेटे यांनी स्पष्ट केलं आहे. त्या आज बीड बातमीदारांशी बोलत होत्या. मात्र आपण शिवसंग्रामची भूमिका ठरवणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. जनतेचा

स्वाभिमान जपावा म्हणून लोकसभा लढवावी अशी मागणी होती, त्यामुळेच आपण शासकीय नोकरीतून सेवानिवृत्ती घेतली होती असंही त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

<u>आयपीएल</u>

आयपीएल क्रिकेटमध्ये आज दिल्ली कपिटल्सचा सामना सनरायझर्स हैदराबादशी होणार आहे. हा सामना संध्याकाळी **7.30** पासून खेळवला जाईल. काल झालेल्या स्पर्धेत लखनौ सुपर जायंट्स संघाने चेन्नई सुपर किंग्जचा आठ गडी राखून पराभव केला.

<u>हवामान</u>

विदर्भात आज सलग दुसऱ्या दिवशी देखील अकोला इथं **44** अंश सेल्सियस इतक्या कमाल तपमानची नोंद करण्यात आली. त्या खालोखाल चंद्रपूर इथं **43** पूर्णांक **8** अंश सेल्सियस आणि वाशिम इथ **43** पूर्णांक **6** अंश सेल्सियस इतकं कमाल तापमान होतं. **42** अंशाच्या घरात असलेल्या जिल्ह्यात अमरावती, वर्धा आणि यवतमाळ यांचा समावेश आहे तर नागपूर सह उर्वरित जिल्हे **40** आणि **41** अंश सेल्सियास च्या घरात आहे. विदर्भात सर्वच जिल्ह्यात तापमानाचा पारा वाढता असून नागरिकांनी उष्मा प्रतिबंधक काळजी घेण्याचं आवाहन प्राशसानातर्फे करण्यात येत आहे. दरम्यान, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया इथं आज आणि उद्या हवामान कोरडं आणि उष्ण राहणार आहे तर चंद्रपूर, गडचिरोली मध्ये मात्र आज आणि उद्या वादळी हवमान राहू शकतं. याशिवाय पश्चिम विदर्भातील यवतमाळ वगळता आज आणि उद्या कुठेही वादळी पर्जन्यमान राहणार नाही.

*****